सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ-तक्रार क्र. बीएम- २३/२०२०**

**तक्रारकर्ता श्री. ॲड. कपील सोनी**
5, Ramnath Mishra Compound, Yashwant Tawde Road,
Dahisar (East), Mumbai- 400 068.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इ.प्र) प.उ.२,**
बृहन्मुंबई महानगरपालिका,उपमुख्य अभियंता यांचे कार्यालय, सी विंग,महानगरपालिका इमारत,
सेंट लॉरेन्स हायस्कूल, संस्कृती कॉम्प्लेक्सजवळ, ठाकूर कॉम्प्लेक्स,
९० फीट रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई-१०१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह-प्रमुख कर्मचारी अधिकारी (इ.प्र) प.उ.२,**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विंग,दुसरा मजला, महानगरपालिका इमारत,
सेंट लॉरेन्स हायस्कूल, संस्कृती कॉम्प्लेक्सजवळ, ठाकूर कॉम्प्लेक्स,
९० फीट रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई-१०१

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २५.०२.२०२०</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. नों.क्र. ३८७४/२०१८ रा.मा.आ. अपील क्र.१६०६/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. ३१.१२.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

१) *"अपिलार्थी यांनी दाखल केलेले व्दितीय अपील अर्ज कलम (१८) अंतर्गत तक्रार म्हणून दाखल करण्यात येत आहेत.*

२) *सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०५.०२.२०२० रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्यात येईल."*

उक्त आदेशानुषंगाने अपिलार्थी यांचा द्वितीय अपील अर्ज तक्रार क्र. २१/२०२० मध्ये दाखल करण्यात आला असून सदर तक्रार अर्जावर दि. ०५.०२.२०२० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. परंतु दि.०५.०२.२०२० रोजीची सुनावणी तहकुब करण्यात आली असुन ती आज दि.२५.०२.२०२० रोजी आयोजित करण्यात आली आहे.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी वेळेची मागणी केली त्यांची मागणी मान्य करुन या प्रकरणी पुढील सुनावणी दि. २७.०३.२०२० रोजी दुपारी ०३.०० घेण्यात येईल.

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : २५.०२.२०२०**

**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**रामाआ तक्रार क्र. बीएम- २३/२०२०**
**तक्रारकर्ता श्री. ॲड कपील सोनी**
**सुनावणी दिनांक : ३०.०६.२०२५ (In continuation of order dt २५.०२.२०२०)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित(व्ही.सी.व्दारे) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रकिंग रिपोर्ट नुसार दि. १४.०६.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रकिंग रिपोर्ट नुसार दि. १४.०६.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे) |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी वेळची मागणी केली होती. त्यांची मागणी मान्य करुन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती.

आजच्या सुनावणी वेळी तक्रारकर्ता (व्ही.सी.माध्यमाव्दारे) उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी कोणतीही पुर्वसुचना न देता अनुपस्थित आहेत.

कोणतेही आदेश पारित करण्याअगोदर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची उपस्थिती आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

१) **जन माहिती अधिकारी आयोगासमोर सुनावणीस कोणतीही पुर्वसुचना न देता अनुपस्थित आहेत. म्हणून त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या २० (१) अन्वये रू. २५,०००/- ची शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

२) **प्रथम अपिलीय अधिकारी आयोगासमोर सुनावणीस कोणतीही पुर्वसुचना न देता अनुपस्थित आहेत. त्यामुळे त्यांच्याविरूध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज- २००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि. ३१.०३.२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगासमोर सादर करावा. सदर मुदतीत लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरून शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.**

३) **सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २९.०७.२०२५ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

30-6-2025

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**
**दिनांक : ३०.०६.२०२५** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**